N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0378 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/04/2025 04:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 15/04/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 23/04/2025

**Time From (वेळेपासून):** 18:38 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/04/2025 **Time (वेळ):** 04:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/04/2025 04:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गूरुनानक चौक,सोलापूर शहर,सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अब्दुलसलाम अब्दुलकरीम शेख

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** अब्दुलकरीम शेख

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एसव्हीसीएम हायस्कुलजवळ,मुजावर गल्ली,मुपो बोरामणी, ,ता दक्षिण सोलापूर,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एसव्हीसीएम हायस्कुलजवळ,मुजावर गल्ली,मुपो बोरामणी, ,ता दक्षिण सोलापूर,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9881509786

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवाजी गंगाधर उंबरजे | | | 1. 21 यशवंत हौसिंग सोसायटी कुमठा ,सोलापुर ,सदर बाज़ार, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारल्याची रक्कम | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

10,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.24.04.2025

मी अब्दुलसलाम अब्दुलकरीम शेख, वय 51 वर्षे, धंदा शेती, रा. एस.व्ही.सी.एम. हायस्कुलजवळ, मुजावर गल्ली, मु.पो. बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर. मो.नं. 9881509786.समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, आमच्या बोरामणी गावामध्ये आम्ही विलासराव देशमुख मजूर सहकारी संस्था मर्यादीत ही संस्था स्थापन केली असून, तिचा रजिस्ट्रेशन नं.SUR/SSR/PRD/(L) 540/2002 असा आहे. मी सदर संस्थेच्या सदस्य असून, आधी मी संस्थेचा संस्थापक चेअरमन होतो. सध्या माझी पत्नी नामे सौ. महजबीन अब्दुलसलाम शेख ही सदर संस्थेची चेअरमन असून, सहाय्यक निंबधक, सहकारी संस्था व इतर शासकीय कार्यालयात संस्थेच्या वतीने पाठपुरावा करण्याचे काम मीच करीत असतो. तसा आमच्या संस्थेने ठराव केलेला आहे. दि. 26/03/2025 रोजी आमच्या संस्थेला सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर यांचे कार्यालयाचे प्रत्र प्राप्त झाले होते. त्यामध्ये अर्जदार श्री. आनंद चव्हाण यांनी दि. 24/03/2025 रोजी आमच्या विलासराव देशमुख संस्थेच्या विरोधात अर्ज केला असल्याचे नमूद करुन, सहकारी संस्था, (विणकर), सोलापूर येथील अप्पर उपलेखापरीक्षक, श्री. एस.जी. उंबरजे यांना संस्थेच्या दप्तरावरुन पाहणी करुन अहवाल सादर करण्याबाबत आदेशीत केले होते. दि. 01/04/2025 रोजीचे 11.57 वा.चे सुमारास माझे वर नमूद मोबाईल नंबरवर मो.नं. 9834404049 यावरुन फोन आला, व ऑडीटर उंबरजे बोलत असल्याचे सांगून, मला त्यांचे कार्यालयात बोलावले, त्यावेळी मी माझ्या शेतीच्या कामामध्ये व्यस्त असल्याचे सांगूण, तीन-चार दिवसांने कार्यालयात येतो असे सांगीतले. त्यानंतर दि.04/04/2025 रोजी मी श्री. उंबरजे साहेब यांना त्यांच्या सहकारी संस्था, पद्मशाली भवन, कन्ना चौक येथील कार्यालयात जावून भेटलो असता, सध्या ते इतर कामामध्ये व्यस्त असल्याचे सांगूण, मला दि. 13/04/2025 रोजीनंतर ते ज्यावेळी फोन करतील त्यावेळी भेटण्यास सांगीतले होते. त्यानंतर दि. 14/04/2025 रोजीचे दुपारी 01.18वा.चे सुमारास माझे वर नमूद मोबाईललाच स्विकारल्याची रक्कम नंबरवर श्री. उंबरजे यांनी फोन करुन, दि. 15/04/20205 रोजी मला त्यांचे कार्यालयात बोलावले, त्याप्रमाणे दि. 15/04/2025 रोजी पुन्हा मी श्री. उंबरजे साहेब यांना त्यांच्या कार्यालयात जावून भेटलो असता, त्यांनी मला आमच्या विलासराव देशमुख मजूर सहकारी संस्थेच्या विरोधात तक्रार आलेली असून, त्याबाबत संस्थेच्या दप्तरावरुन पाहणी करुन अहवाल सादर करण्याबाबत त्यांना सहाय्यक निबंधक श्री. झालटे साहेब यांनी आदेश दिलेले आहेत. व त्यांना दिलेल्या अहवालावरुनचे पुढे श्री. झालटे साहेब आपल्या संस्थेवर कार्यवाही करणार आहेत. त्यामुळे तुमच्या संस्थेवर कोणतीही कारवाई होऊ नये यासाठी अहवाल तुमच्या संस्थेच्या बाजूने सकारात्मक पाठवावा म्हणून श्री. उंबरजे साहेब यांनी माझ्याकडे 25,000/- रुपयांची मागणी केली. त्याबाबत मी अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरचे पोलीस उप अधीक्षक श्री. कूंभार साहेब यांना त्याच दिवशी 16.45 वा. फोन करुन माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीची तक्रार सांगीतली होती. व त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी रंगभवन चौक येथील अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथे हजर झालो. दरम्यानचे काळामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री. कूंभार यांनी उत्तर तहसील कार्यालय येथील दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेवून, आम्हास दोन्ही पंचाची ओळख करुन देवून, मला माझी तक्रार पंचा समक्ष विचारुन घेतली. त्यावेळेस मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगून पोउपअधी. श्री. कूंभार सांगण्यावरुन लेखी तक्रार लिहून दिली. सदर लेखी तक्रारीवर पोउपअधी. श्री. कूंभार व दोन्ही पंचानी वाचून सहया केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोउपअधी. श्री.कूंभार यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये त्यामध्ये यापुर्वी कोणतेही रेकॉर्डींग नसल्याचे खात्री करून दिली व श्री. उंबरजे साहेब यांची भेट घेण्यासाठी म्हणून मला माझे वर नमूद मो.नं. वरुन श्री. उंबरजे यांचे मो.नं. 9834404049 यावर फोन करण्यास

सांगीतले. त्याप्रमाणे 18.38 वा. मी श्री. उंबरजे यांना फोन लावला असता, त्यांनी मला गुरुनानक चौक येथे भेटण्यासाठी बोलावले. सदरवेळी आमच्यामध्ये झालेले संभाषण पोउपअधी. श्री. कूंभार यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्डर करुन घेतले. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी मला व पंच क्र.01 श्री. कडू यांना योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळ्यात अडकवून मला श्री. उंबरजे यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.01 श्री. कडू यांच्यासह माझे होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच 13 डीव्ही 5329 वरुन 18.49 वा. रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे गुरुनानक चौक येथे गेला असता, तेथे उंबरजे आले नसल्यामुळे मी माझ्या मो.नं.वरुन उंबरजे यांना फोन केला, काहीवेळाने ते तेथे आले व आम्हाला ऑफीसर क्लब येथे घेवून गेले. तेथे आमच्यामध्ये प्रथम आमच्या विलास देशमुख मजुर सहकारी संस्था व त्यासंबंधी झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी पत्रकार रमीज राजा यांना बोलून प्रकरण कसे मिटवायचे ते सांगतो असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना हयामध्ये त्याचा काय संबंध आहे असे विचारले असता, तक्रारदार चव्हाण याचे तक्रार करण्याचे मागे पत्रकार रमीज राजा हाच असल्याचे सांगूण, त्यांनी चव्हाण यांना फोन केला, व त्यांना माझी भेट झाल्याचे सांगून, उदया भेटण्यास सांगीतले. त्यानंतर श्री. उंबरजे यांनी मला आमच्या संस्थेचे दप्तर तपासणी साठी देण्यास सांगीतले. त्यावेळी मी सदर दप्तर ऑडीटर श्री. आय.के. शेख यांच्याकडे पूर्ण करण्यासाठी दिले असल्याचे सांगीलते. त्यानंतर श्री. उंबरजे यांनी ऑडीटर श्री. शेख यांचा मो.नं. माझ्याकडून घेवून, त्यांचे मोबाईलवरुन त्यांना फोन लावला परंतू ऑडीटर शेख यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. कडू असे परत अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो. त्यावेळी पोउपअधी. श्री. कूंभार यांनी माझ्या गळ्यातील व्हाईल रेकॉर्डर काढून घेवून बंद केला, त्यावेळी 19.58 वाजले होते. त्यानंतर मी वरील हकिगत सांगितली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी व्हाईस रेकॉर्डर त्यांच्याकडील संगणकाला जोडून त्यामधील संभाषण रिव्हर्स-फॉरवर्ड करुन, पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे समक्ष ऐकले. त्यावेळी पोउपअधी. श्री. कंुभार यांनी रमीज राजा कोण आहे असे विचारले असता, रमीज राजा हा पत्रकार असून, तक्रारदार श्री. आनंद चव्हाण यांनी आमच्या संस्थेच्या विरोधात केलेल्या तक्रारीच्या आधारे रमीज राजा हा त्याच्या पनाह नावाच्या साप्ताहिकामध्ये आमची विलासराव देशमुख मजुर संस्था व माझ्याविरोधात बदनामकारक बातम्या छापत असल्याचे सांगीतले. व यामध्ये ऑडीटर श्री. उंबरजे हा त्यांना मिळाला असल्याचे व त्याच आधारे माझ्याकडे लाचेची मागणी करीत असल्याचे मी पोउपअधी. श्री. कूंभार न्ही पंचांना सांगीतले. त्यानंतर श्री. उंबरजे यांनी बोलावल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे आमच्या ठरवून, सदर कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर दि. 16/04/2025 रोजी ऑडीटर श्री. उंबरजे हे आमच्या गावातील विविध विकास सोसायटीमध्ये आले होते, त्यावेळी श्री. उंबरजे यांनी मला उदया दि. 17/04/2025 रोजी फोन करुन भेटायला येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी पोउपअधी. श्री. कूंभार यांना माहिती देवून, दि. 17/04/2025 रोजी मी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात पोउपअधी. श्री. कूंभार यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी दि. 15/04/2025 रोजीचे कारवाई वेळी असलेले शासकीय पंच हजर होते. सदरवेळी श्री. उंबरजे यांचेवर पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने त्यांची भेट घेण्यासाठी म्हणून पोउपअधी. श्री. कूंभार यांनी मला माझे वर नमूद मो.नं. वरुन श्री. उंबरजे यांचे मो.नं. 9834404049 यावर फोन करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे 14.01 वा. मी श्री. उंबरजे यांना फोन लावला असता, त्यांनी मला आरसा मैदान येथील लोकमंगल बँकेसमोर डीसीसी बँकेच्या ऑडीट ऑफीसमध्ये भेटण्यासाठी बोलावले. सदरवेळी आमच्यामध्ये झालेले संभाषण पोउपअधी. श्री. कूंभार यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्डर करुन घेतले. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी मला व पंच क्र. 02 श्री. केरे यांना योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळ्यात अडकवून मला श्री. उंबरजे यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.02 श्री. केरे यांच्यासह माझे होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच 13 डीव्ही 5329 वरुन 14.32 वा. रवाना केले. त्याप्रमाणे मी श्री. उंबरजे यांना पंच क्र. 02 केरे यांचेसह भेटलो असता, आमच्यामध्ये संस्थेच्या तक्रारीच्या अनुषंगाने बोलणे झाले व त्यांनी मला त्यांचे सहीचे पत्र देवून आमच्या विलासराव देशमुख मजूर सहकारी संस्थेविरुध्द श्री. आनंद चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारच्या अनुषगांने चौकशी कामकाजाबाबत सर्व रेकॉर्ड अदयावत ठेवून तात्काळ या कार्यालयास संस्थेचे दप्तर देण्याबाबत कळविले. व एकाप्रतीवर माझी सही घेतली. त्यावेळी मी सदर दप्तर ऑडीटर श्री. आय.के. शेख यांच्याकडून पूर्ण झाल्यानंतर देतो असे सांगून, अहवाल लवकर देण्यास सांगीतले असता, त्यावर श्री. उंबरजे "प्रशासक म्हणून.. की बाबा अस अस संबंधित तक्रार अलय म्हणून तुम्ही अहवाल सादर करा अहवाल सादर केल्यावर तुम्हाला पुढच का लाच स्विकारल्याची रक्कम य करायच की नाही त्यांच्यावर आहे. पण अहवाल सादर काय करायचं ते आमच्यावर आहे.. मारायच की सोडायच आमच्यावर आहे.." असे म्हणाले. त्यावर मी "अहवाल करणार तुम्हीच आहेना शेवटी.." असे म्हणालो. त्यावर ते मला "तुम्ही मला सपोर्ट करा ओ.. मी तुम्हाला मदत नाही म्हणले का सांगा.." असे म्हणाले. त्यावर मी "मी सपोर्ट नाही म्हणलो का साहेब.." असे म्हणालो असता, ते मला "नई नई आम्ही सांगतो बाबा आमच आमच एवढ दया .. तुमच तुमच भेटुन

जाईल" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "नई नई तुम्हीच सगळ मोकळ करायच मोकळ त्यांच काय संबंध .. रिपोर्ट देणारे तुम्ही हं.." असे म्हणालो असता, श्री. उंबरजे मला "नाही ते घेणार अस कस होतय साहेब.. दप्तर बघीतल्याशिवाय कस" असे म्हणून मला आमच्या संस्थेचे दप्तर आणण्यास सांगीतले. व त्यानंतर पुढील चर्चा करण्याचे आमच्यामध्ये ठरले. त्यानंतर मी व पंच क्र. 02 श्री. केरे असे परत अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो. त्यावेळी पोउपअधी. श्री. कूंभार यांनी माझ्या गळ्यातील व्हाईल रेकॉर्डर काढून घेवून बंद केला, त्यावेळी 15.30 वाजले होते. त्यानंतर मी वरील हकिगत सांगितली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी व्हाईस रेकॉर्डर त्यांच्याकडील संगणकाला जोडून त्यामधील संभाषण रिव्हर्स-फॉरवर्ड करुन, पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे समक्ष ऐकले. त्यानंतर आमच्या विलासराव देशमुख संस्थेचे दप्तर पूर्ण अदयावत झाल्यानंतर ते घेवून श्री. उंबरजे यांनी भेटण्याचे व त्यानंतर पुढील कारवाई करण्याचे आमच्या ठरवून, सदर कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर काल दि. 22/04/2025 रोजी सकाळच्या वेळेस मी माझ्या शेतात कामामध्ये व्यस्त असताना श्री. उंबरजे याचा दोन वेळा फोन आला परंतू मी उचलला नाही. त्यानंतर आज दि. 23/04/2025 रोजी मी सोलापूर येथे येवून आमच्या संस्थेच दप्तर अदयावत करुन दुपारी 03.06 वाजताचे दरम्यान श्री. उंबरजे यांना फोन केला असता, त्यांनी मला भेटण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी पोउपअधी. श्री. कूभांर यांना माहिति देवून, अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात पोउपअधी. श्री. कूभांर यांचे समक्ष संस्थेच्या दप्तरासह हजर झालो. त्यावेळी दि. 15/04/2025 रोजीचे शासकीय पंच हजर होते. सदरवेळी श्री. उंबरजे यांचेवर पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने त्यांची भेट घेण्यासाठी म्हणून पोउपअधी. श्री. कूभांर यांनी मला माझे वर नमूद मो.नं. वरुन श्री. उंबरजे यांचे मो.नं. 9834404049 यावर फोन करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे 17.46 वा. मी श्री. उंबरजे यांना फोन लावला असता, त्यांनी मला गुरुनानक चौकामध्ये भेटण्यासाठी बोलावले. सदरवेळी आमच्यामध्ये झालेले संभाषण पोउपअधी. श्री. कूभांर यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्डर करुन घेतले. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी मला व पंच क्र.02 श्री. केरे यांना योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून मला श्री. उंबरजे यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.02 श्री. केरे यांच्यासह माझे होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच 13 डीव्ही 5329 वरुन 18.13 वा. संस्थेच्या दप्तरासह रवाना केले. त्याप्रमाणे मी श्री. उंबरजे यांना पंच क्र. 02 केरे यांचेसह गेलो असता, आमची गुरुनानक चौकाजवळ असलेल्या "ॠ 1" नावाच्या पत्र्याच्या शेडमध्ये असलेल्या हॉटेलमध्ये भेट झाली. त्यावेळी श्री. उंबरजे यांनी "कायाय बगु..काय दिलय..मी तेला हेला सांगितल होत इरफानला" असे म्हणून माझ्याकडून संस्थेचे दप्तर घेतले. त्यावेळी मी "किर्द..खतावणी..किर्द खतावणीय कम्प्युटरायजड, जे नमुना, आय नमुना" असे म्हणालो. त्यानंतर श्री. उंबरजे मला "तेज्यामुळच आणा म्हणलो फाईल ते सभासद तक्रार केलेत तेव्हडच बघायचय.. आणि..हे पहिल बघतो तुमच आठ दिवस काय-काय मिटतय.. मिटवायच.." असे म्हणाले असे म्हणाले असता, मी "आता दिलय की..साहेब तुमच्याच हाताताय, करुन टाका कशाला.. मग तुमीचाय की सगळ करणारं आता ते.." असे म्हणालो. त्यावर श्री. उंबरजे "मग काय बोलतो कि मी तेंना, काय म्हणतेत ते बोलतो बगतो..हे आपल-आपल बगा तुमी काय झाल्यावर दिल.." असे म्हणाले, त्यावर मी "बोला तुमी बोला, बगा म्हणजी काय..नाय तुमीच बोलायच स्पष्ट बोला.." असे म्हणालो असता, श्री. उंबरजे "स्पष्टच बोलतो मी, माझ काय कसाय माहितीय का पुढच्या माणसाला अंधारात ठेवायचच नाय, तेला होतय तर होच म्हणायच नाहीतर नाय..म्हणायच, कारण तेन तेज रस्ता पकडील ना..मग काय तर थोड जमा करायचे.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "किती.." असे विचारले असता, त्यांनी मला "पाच-दहा हजार.." असे सांगीतले. त्यावर मी "दहा हजार..सगळच मिटवनार का.." असे विचारले असता, श्री. उंबरजे मला "हे..हे..सगळ्याच काय नाय ओ, हेच बोलायलो मी.. तो पर्यंत द्या, बोलतो म्हणालो. नसेल तर द्या नाहीतर राहुद्या, काय झाल्यावर द्या, हे तर मिटवायचचाय..तेज्या बरोबर, हे मिटल म्हणजे..हे मिटतयच विषय सोडा..." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "हं.. म्हणजे हेच्यावर सगळ मिटवणार का..अजुन.." असे विचारले असता, श्री. उंबरजे मला "नाय..एवढयावर कस मिटतय ओ..तेंना बोलु की..काय.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "काय सगळच मोकळ करा की.." असे म्हणालो असता, ते मला "ते झाल..हे माझ्या विषयी बोलालो..मी.. ते मिटल म्हणजे, हे मिटतयच कि ओ..विषयच संपल की." असे म्हणाले. त्यावर मी "किती सांगा अमाऊंट तुमी फिक्स" असे विचारले असता, श्री. उंबरजे मला "नाय ते अमाऊंट वेगळचाय सोडा, मी हेच्यापुरत बोलालोय आता.. आता जे तुमी मला दिलय ना..तेज्याबद्दल बोलालो. ते मिटवतोच सोडा ते.. ते मिटवायच तेंचा आकडा सांगतो की, त्यात माझ काय देण-घेण नाय..हे माझ्या पुरत बोलालो मी.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तेंच आकडा म्हंजी, तेंना कुठ आमी देणार तुमालाच देणार ना आमी.." असे म्हणालो असता, श्री. उंबरजे मला "हो मलाच देणार पण तेंच्या कडुन विचारुन सांगाव लागेल ना.." असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "तुमच किती-तुमच किती.." असे विचारले असता, श्री. उंबरजे हे मला "मी तुमाला द्या म्हणल कि..सात-आठ, दहा हजार रुपये द्या." असे म्हणून माझ्याकडे 10,000/- लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व

पंच क्र. 02 श्री. केरे असे परत अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो. त्यावेळी पोउपअधी. श्री. कूंभार यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला, त्यावेळी 18.57 वाजले होते. त्यानंतर मी वरील हकिगत सांगितली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी व्हाईस रेकॉर्डर त्यांच्याकडील संगणकाला जोडून त्यामधील संभाषण रिव्हर्स-फॉरवर्ड करुन, पंच क्र.01 व पंच क्र.02 यांचे समक्ष ऐकून खात्री केली.
सदर पडताळणी कारवाईदरम्यान श्री. उंबरजे साहेब यांनी संस्थेचा अहवाल अनुकुल पाठविण्यासाठी म्हणून 10,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पोउपअधी. श्री.कूंभार यांनी ऑडीटर श्री. उंबरजे यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवीले. त्याप्रमाणे त्यांनी सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन, मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देवून प्रात्यक्षिक दाखवले, सदर वेळी मी हजर केलेले 10,000 /- रू. रक्कमेच्या नोटांचे नंबर स्टाफकरवी एका कागदावर लिहुन, त्यावर सह्या करुन तो कागद पोउपअधी. श्री. कूंभार यांनी त्यांचे कडे ठेवला. त्यानंतर सदर नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सापळापुर्व कारवाई पुर्ण करुन सदरच्या नोटा माझ्या नेसते शर्टच्या डाव्या बाजूच्या वरील खिशात ठेवल्या. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्री. उंबरजे यांचेवर सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने त्यांची भेट घेण्यासाठी म्हणून पोउपअधी. श्री. कूंभार यांनी मला वर नमूद मो.नं. वरुन श्री. उंबरजे यांचे मो.नं. 9834404049 यावर फोन करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे 19.35 वा. मी श्री. उंबरजे यांना फोन लावला असता, त्यांनी मला अशोक चौक पोलीस चौकी समोरील एटीएमजवळ पैसे घेवून येण्यास सांगीतले. आमच्यामध्ये झालेले संभाषण पोउपअधी. श्री. कूभांरयांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करुन घेतले. त्यानंतर पोउपअधी. श्री. कूंभार यांनी श्री. उंबरजे यांचेवर सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून मला, पंच क्र.02 - श्री. केरे यांच्यासह माझी होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच 13 डीव्ही 5329 वरुन 19.39 वा. रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोउपअधी. श्री. कूंभार हे पंच क्र. 01 कडू व सापळा पथकासह शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून अशोक चौक पोलीस चौकी परिसरात कोणालाही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबून राहिले. व मी व पंच क्र. 02 अशोक चौकातील एक्सेस बँकेच्या एटीएम समोर श्री. उंबरजे यांची वाट पाहत थांबलो. सदर ठिकाणी श्री. उंबरजे साहेब न आल्याने मी माझ्या मोबाईलवरुन त्यांना फोन केला असता, त्यांनी फोन उचलला नाही. काही वेळाने श्री. उंबरजे हे त्यांच्या सुझुकी एक्सेस मोटर स्कुटर क्र. एमएच 13 डीव्ही 6183 या वरुन आले. आमच्यामध्ये प्रथम इतर बोलणे झाले, नंतर मी त्यांना "देवु का 10000 रुपये" असे म्हणालो असता, त्यांनी त्यांच्या मोटर स्कुटरची डिक्की उघडून "टाका...टाका" असे म्हणाले. त्यावेळी मी माझ्या शर्टच्या वरील खिशात ठेवलेले 10,000/-रुपये लाच रक्कम माझ्या उजव्या हाताने काढून श्री. उंबरजे साहेब यांचे समोर धरुन "अरे घ्याव ओ मोजुन..हातातले दिले.." असे म्हणालो असता, सदर लाच रक्कम श्री. उंबरजे साहेब यांनी उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे मोटर स्कुटरच्या डिक्कीमध्ये ठेवली. त्यावेळी मी त्यांना पुन्हा "मोजुन घ्या ऐका जरा.." असे म्हणालो असता, त्यावर श्री. उंबरजे "आहो..विश्वास ठेवा ओ..आपल्या लोकावर हे महत्त्वाचे हाय" असे म्हणाले. त्यानंतर ठरल्याप्रमाणे मी माझ्या पॅण्टच्या खिशातील रुमाल काढून वारंवार तोंडावरुन फिरवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा पोउपअधी. श्री. कुंभार यांना केला. त्यावेळी पोउपअधी. श्री. कुंभार यांना व सापळा पथक यांनी श्री. उंबरजे साहेब यांना ताब्यात घेतले आणि पोउपअधी. श्री. कुंभार यांना यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला. त्यावेळी 19.52 वाजले होते. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांना श्री. उंबरजे यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. शिवाजी गंगाधर उंबरजे, वय-57 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- अप्पर उप लेखापरीक्षक, नेमणुक- सहकारी संस्था (विणकर) सोलापूर, रा. घर नं. फ्लॅट नं. 21/ब, यशवंतनगर गृहनिर्माण संस्था, मार्कंटेयनगरचे जवळ, कुमठा नाका, सोलापूर असे सांगितले. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांना जवळ असलेल्या अशोक चौक पोलीस चौकी येथे श्री. उंबरजे यांना त्यांचे कडील सुझुकी एक्सेस मोटर स्कुटर क्र. एमएच 13 डीव्ही 6183 हया मोटर स्कुटरसह सापळा पथकातील कर्मचा-यांसह घेवून गेले. तेथे दोन्ही पंचासमक्ष सापळ्यातील प्राथमिक तपासण्या पूर्ण करुन, त्याचे व्हिडीओ शुटींग करुन, श्री. उंबरजे यांच्याकडून लाच रक्कम हस्तगत करुन ती पंच क्र. 01 कडू यांच्या ताब्यात दिली. त्यानंतर पुढील सविस्तर पडताळणी सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे आल्यानंतर पुर्ण करण्यात आले आहे.
तरी आज दि. 15/04/2025 रोजीचे 18.38 वाजल्यापासून ते दि. 23/04/2025 रोजीचे 19.52 वाजे दरम्यान श्री. शिवाजी गंगाधर उंबरजे, वय-57 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद- अप्पर उप लेखापरीक्षक, नेमणुक- सहकारी संस्था (विणकर) सोलापूर, यांनी त्यांनी मला आमच्या विलासराव देशमुख मजूर सहकारी संस्था, बोरामणीच्या विरोधात श्री. आनंद चव्हाण यांनी केलेल्या तक्रारीवरुन संस्थेच्या दप्तरावरुन पाहणी करुन तुमच्या

संस्थेवर कोणतीही कारवाई होऊ नये यासाठी अहवाल तुमच्या संस्थेच्या बाजूने सकारात्मक पाठवावा म्हणून श्री. उंबरजे साहेब यांनी माझ्याकडे 25,000/- रुपयांची करुन पहिला हप्ता म्हणून 10,000/- लाच रक्कम स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

समक्ष

(गणेश कुंभार)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ajit shankar lakade(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अंमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** ajit shankar lakade
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** PI